


Scanned by CamScanner



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| • मा. श्री. मदनलाल मिश्रा | अध्यक्ष |
| • श्री. आनंद राजवाडे | प्रमुख मार्गदर्शक |
| • मा. दलूभाऊ जैन | उपाध्यक्ष |
| • श्री. संजय मुंदडा | कार्याध्यक्ष |
| • श्री. लखनजी भतवाल | कार्योपाध्यक्ष |
| • श्री. प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे | मुख्य चिटणीस |
| • श्री. व्यंकटेश दाबके | खजिनदार |
| • श्री. प्रा. सुनिल मुंदडा | वस्तु संग्रहालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. मृदुला वर्मा | संशोधक त्रैमासिक चिटणीस |
| • श्रीमती जयश्री शहा | ग्रंथालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. उज्वला नेहते | संशोधन व प्रकल्प चिटणीस |
| • प्राचार्या डॉ. सुनंदा अहिरे | संशोधन अधिकारी |
| • सौ. लता आगीवाल | कार्यकारी सदस्य |
| • प्रा.श्री.श्रीपाद नांदेडकर | क्युरेटर (पदसिद्ध) |

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


१ **ग्रामीण जीवन–व्यवहाराचे बदलते स्वरूप**
– डॉ.गजानन भामरे, निमगाव, ता.मालेगाव ------- ०९

२ **ग्रामीण साहित्यातील सामाजिकता**
– श्री. वर्षा अहिरे/डॉ.सपना सोनवणे, मालेगाव – १५

३ **दलित आत्मकथनातील समाज चित्रण**
– प्रा.डी. ए. पाटील, शिरपूर, ता.धुळे ------- २०

४ **डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनोद**
– डॉ. अरूण पाटील, मालेगाव, जि.नाशिक ---------- २६

५ **दलित कथाकार अण्णाभाऊ साठे**
– डॉ.अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक------- ३१

६ **दलित जाणीव चित्रण करणारी 'झूल' एक अभ्यास**
– डॉ.सोमनाथ पावडे, सुरगणा, जि.नाशिक -------- ३७

७ **दलित साहित्यातील सामाजिकता**
– डॉ. वैशाली पाटील, चाळीसगाव ------------- ४४

८ **दलित साहित्यातील वेगळेपण**
– डॉ.सौ.मिनाक्षी पाटील, मालेगाव, जि.नाशिक --- ५३

९ **आंबेडकरी चळवळीचे शिलेदार वामनराव गरूड**
– डॉ. स्वप्नील गरुड, देवळा, जि.नाशिक --------- ५८

१० **ग्रामीण साहित्याची चळवळ**
– डॉ. किरण पिंगळे ---------------------- ६७

११ **साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री समाजजीवन**
– डॉ.सुरेखा जाधव, निफाड, जि.नाशिक ------- ७५






Scanned by CamScanner

# ग्रामीण साहित्यातील सामाजिकता

– डॉ. वर्षा अहिरे/डॉ.सपना सोनवणे, मालेगाव

साठोत्तरी साहित्यात सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनामुळे व साहित्यातील प्रवाहांमुळे मराठी साहित्याचे पात्र अधिक विस्तारले मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्याचा समृद्ध असा प्रांत आहे. मराठी ग्रामीण साहित्याने मराठी साहित्याला आशय व अभिव्यक्ती दृष्ट्या संपन्न केलेले आहे. मराठी साहित्यातील सामाजिकतेचे अतूट नाते ग्रामीण साहित्यात खऱ्या अर्थाने प्रकट झालेले आहे. समाजपरिवर्तनाचा वेध घेत मानवी समाज आणि समाजांतर्गत येणाऱ्या बहुतेक सर्व घटकांना सामावून ग्रामीण साहित्याचा प्रवाह समृद्ध झाला. मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या ग्रामीण, दलित साहित्या संदर्भात सामाजिकतेचा संबंध अधिक दृढ वाटतो साहित्याचे सामाजिक संदर्भ कोणतेही असले तरी साहित्यातून मानवाचे जे दर्शन घडते ते सार्वत्रिक असते.

समाजाचे साहित्यावर आणि साहित्याचे समाजावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम होत असतात त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे लेखक, वाचक आणि भाषा हे साहित्य क्षेत्रातील मूलभूत घटक असतात. हे घटक समाजाचे एक भाग असतात. साहित्य निर्मितीमधील आणि साहित्य व्यवहारांमधील समाज हा अत्यंत महत्त्वाचा आणि अचल असा घटक असतो. त्या त्या काळातील समाज जसा असतो त्याप्रमाणे त्या काळातील साहित्य आणि साहित्यव्यवहार हा त्यानुरूप आकार धारण करत असतो. समाजाचा आणि सामाजिकतेचा विचार केल्याशिवाय साहित्यनिर्मितीचा आणि साहित्य व्यवहाराचा अर्थ कळतच नाही. साहित्यकृतीतून आविष्कृत झालेला अनुभव हा कुठल्या तरी समाजातीलच असतो. समाजाशिवाय अनुभव नावाचा घटक अशक्यच असतो. लेखकाची जडणघडण त्याची मूल्यदृष्टी ही त्याच समाजात आणि त्या समाजाच्या परिप्रेक्षात विकसित झालेली असते. साहित्याचा मुलाधार मानवी जीवन आणि त्याचा समाज हाच असतो. समाजजीवनाला वगळून साहित्याची निर्मिती करणे म्हणजे हवेत मनोरे बांधण्यासारखे आहे. कोणतीही चांगली दर्जेदार साहित्यकृती अशी नुसत्या कल्पनेवर



Scanned by CamScanner

निर्माण करता येत नाही तर त्या साहित्यकृतीचा गाभा किंवा केंद्र हा माणूस व त्याचे जगणे हाच असतो. म्हणूनच साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य मानले जाते. ग्रामीण साहित्यातील लेखक हा प्रामुख्याने ग्रामीण भागातीलच असल्याने ग्रामिण समाजाचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात पाहावयास मिळते.

ग्रामीण साहित्य हे सामाजिक बांधिलकी जोपासणारे साहित्य आहे. ग्रामीण साहित्यातील आशय हा महत्त्वाचा ठरतो. हा आशय नेहमीच ग्रामीण समाजाशी संलग्न असा असतो या संदर्भात वा. ल. कुलकर्णी यांनी असा विचार मांडला आहे की, ''कलामूल्ये ही कलाकृतीचा चांगुलपणा ठरवू शकते तिचे श्रेष्ठत्व ठरवायला जीवनमूल्यांचा विचार करायला हवा. जीवनदर्शन सखोल आणि उत्कृष्ट असेल अशा कलाकृतीतील आशयाचा अन्वय लावण्यासाठी त्या साहित्यकृतीवरील, लेखकांवरील, साहित्य प्रकारावरील सामाजिकतेचा प्रभाव जाणून घेणे आवश्यक ठरते.'' उदा. ग्रामीण साहित्यातील आशय, सामाजिक संबंध, संस्कृती, परिस्थिती यांचा अभ्यास करावा लागतो. ग्रामीण साहित्यात ग्रामीण समाजजीवन प्रत्यक्ष अनुभूतीतून साकार झालेले आहे.

लेखक हा समाजातील एक घटक असतो त्यामुळे त्याच्या साहित्यकृतींवर समाजाचा प्रभाव जाणवतो साहित्यातून उपस्थित होणारे प्रश्न अंतिमत: किंवा गर्भितपणे सामाजिक प्रश्न असतात. ग्रामीण समाजातील शेती व्यवसाय आणि शेतकरी जीवन हा ग्रामीण साहित्याचा गाभा असतो. ग्रामजीवन तेथील वैशिष्ट्यपूर्ण अशी कृषीसंस्कृती, गावगाडा, निसर्ग तेथील समाजजीवन शेतकऱ्यांचे शोषण व दारिद्र्य यांचे अस्सल बोली मधून साकारलेले चित्रण ग्रामीण साहित्यात पाहावयास मिळते. ग्रामीण साहित्य व सामाजिक बांधिलकी यांच्यात परस्परसंबंध निर्माण करणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे लेखकाचे सामाजिकीकरण होय कारण लेखकाच्या प्रतिभेचा आविष्कार करताना समाज त्यात डोकावत असतो. लेखक ही एक व्यक्ती असते व्यक्तीचे सामाजिकीकरण घडते. त्याचप्रमाणे लेखकाचे देखील सामाजिकीकरण घडत असते. ग्रामीण साहित्यात लेखकाच्या प्रत्यक्ष अनुभूतीचा आविष्कार घडला आहे. अतिवृष्टी, दुष्काळ तसेच शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना, दारिद्र्य यांचे ग्रामीण साहित्यातील वास्तव चित्रण हा लेखकाचा



Scanned by CamScanner

सामाजिकीकरणाचाच एक भाग आहे. म्हणूनच भूमिपुत्राची अगतिक अवस्था कृषिजीवनातील दु:खांचे अनेक पदर या साहित्यातून अभिव्यक्त होतात. साहित्यकृतीला साहित्यमूल्य असल्याशिवाय साहित्यत्व प्राप्त होत नाही. साहित्यिक हा आपल्या अनुभवांचा कलात्मक आविष्कार करत असतो या प्रक्रियेसाठी लेखक जी सामग्री वापरतो ती त्याच्या समाजजीवनातूनच आलेली असते. उदा. आनंद यादव, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, भास्कर चंदनशिवे यांच्या साहित्यात गावगाडा, निसर्ग, शेती, शेतीत राबणारा कष्टकरी, त्याचे दारिद्र्य, बदलते ग्रामजीवन यांचा वेध घेतला आहे. या ग्रामीण लेखकांना त्यांच्या जीवनातील आलेल्या प्रत्यक्ष अनुभवांचा कलात्मक आविष्कार या साहित्यात होत आहे. अशी कलामूल्य ही पूर्णपणे समाज निरपेक्ष असूच शकत नाहीत. त्यामुळे ग्रामीण साहित्यामध्ये आपल्याला सामाजिकता अधिक बघायला मिळते.

१९६० नंतर ग्रामीण कादंबऱ्यांतून यंत्र संस्कृतीमुळे ग्रामीण जीवनात अधिक परिवर्तन झाले आहे व त्यामुळे ग्रामीण जीवन हवालदिल झालं याचे वास्तव चित्रण करतात कृषी संस्कृतीतील यंत्र संस्कृतीने शिरकाव करून ग्रामीण जीवनातील सुख समृद्धी हिरावून घेतली आहे. याचे वास्तव चित्रण मनाचा वेध घेते. उदा. आनंद यादव यांनी 'गोतावळा' या कादंबरीत नारबाचे आणि त्याच्या भावविश्वाचे अस्सल दर्शन घडवले आहे. येऊ घातलेल्या यंत्र युगामुळे कृषीसंस्कृतीत तेथील मानवी जीवनात शेतीशी संबंधित प्राणी सृष्टीची कशी परवड होऊ घातली आहे याचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. 'गोतावळा' ही कादंबरी ग्रामीण साहित्यालाच नव्हे तर एकूणच मराठी साहित्याला नवी दिशा देणारी ठरली. राजकारणाने अतिशय भयानक अशा समस्यांना जन्म दिला आहे या समस्यांनी ग्रासलेले ग्रामीण जीवनाचे दर्शन ग्रामीण साहित्यात केले गेले. उदा. – सदानंद देशमुख हे धर्मकारण, राजकारण, अर्थकारण यांनी ग्रामीण जीवनात घातलेला धुडगूस प्रभावीपणे 'लचांड' आणि 'उठवण' या कथासंग्रहातून चित्रित करतात.

ग्रामीण साहित्यातील लेखक वेगवेगळ्या सामाजिक स्तरांमधून आलेले आहेत त्यामुळे त्यांच्या लेखनात ग्रामीण जीवनाचे बहुविध चित्रण होताना दिसते. भास्कर चंदनशिवे, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, इंद्रजित भालेराव, श्रीकांत



Scanned by CamScanner

ISSN No. 2394-5990

यांचे चित्रण या कवितांमधून येते. इंद्रजित भालेराव यांचा 'दूर राहिला गाव' हा काव्यसंग्रह गावाकडच्या आठवणी व्यक्त करणारा आहे.

आपल्या वाटा आता आपणच शोधल्या पाहिजेत या जाणिवेतून बहुजनांचे वेगवेगळे गट स्वातंत्र्योत्तर कालखंडात कार्यरत झाले; त्यातून विविध सामाजिक चळवळींच्या सांस्कृतिक आघाड्या म्हणून मग वाङ्मयीन चळवळी सुरू झाल्या या चळवळीं पैकीच एक असलेल्या ग्रामीण साहित्य चळवळींचे फलित म्हणजे ग्रामीण साहित्याला कसदारपणा लाभला व त्यामुळे मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्याचा समृद्ध असा प्रांत तयार झाला.

**संदर्भ :-**


१ ) प्रा. डॉ. अरविंद वामन कुलकर्णी , (१९९७), 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) डॉ. आनंद यादव, ( १९७९), ' ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे .

३) डॉ .आनंद यादव, (१९८१), संपादन, 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४ ) डॉ. आनंद यादव, (२००१), ' १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५ ) डॉ. अंजली सोमण, (२००६), 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ ', प्रतिमा प्रकाशन, पुणे.


* * *



Scanned by CamScanner